दिनांक ०४/११/२०११ रोजी झालेल्या काम वाटप समितीचे इतिवृत्त

दिनांक ०४/११/२०११ रोजी काम वाटप समितीच्या बैठकिस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| अ क्र | नांव | पदनाम | समिती अध्यक्ष/सदस्य |
|---|---|---|---|
| १ | श्री रविंद्र पाटील | अध्यक्ष काम वाटप समिती तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि प अहमदनगर | अध्यक्ष |
| २ | श्री. डी.जी.पालवे | कार्यकारी अभियंता जि प सा बां उत्तर विभाग अहमदनगर | सचिव |
| ३ | श्री. निकम एस.सी | कार्यकारी अभियंता जि प ग्रापापु विभाग अहमदनगर | सदस्य |
| ४ | श्री. पी.यु.बिसेन | कार्यकारी अभियंता जि प ल.पा विभाग अहमदनगर | सदस्य |
| ५ | श्री. पी पी खंडागळे | कार्यकारी अभियंता जि प सा बां दक्षिण विभाग अहमदनगर | सदस्य |

मा अध्यक्ष, काम वाटप समिती तथा अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली काम वाटपाची बैठक सोमवार दि.०४/११/२०११ रोजी घेण्यात आली.

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.ग्रासयो-२००७/प्रक्र१/यो-९ दि.८ मे २००७ नुसार काम वाटप समितीची बैठक ०४/११/२०११ रोजी आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकित सचिव, काम वाटप समिती, कार्यकारी अभियंता जि प सा बां उत्तर विभाग यांचे पत्र क्र बांध/लेखा/निविदा/२५९/२०११ दि.२५/१०/२०११ नुसार सर्व समिती सदस्यांना कळविण्यात आले होते कि, उपरोक्त शासन निर्णय दि.८ मे २००७ मधील मुददा ३.२-३ नुसार संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी काम वाटप समितीकडे सोसायटी व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना वाटप करावयाच्या मंजुर कामांच्या यादया नोटीस बोर्डवर प्रसिध्द कराव्यात. त्यानुसार संबंधीत कार्यकारी यंत्रणा यांनी दि.३१/१०/२०११ पुर्वी त्यांचेकडील नोटीस बोर्डवर काम वाटप करावयाच्या सर्व कामांच्या सुशिक्षीत बेरोजगार अभियंता ठेकेदार व मजुर सहकारी सोसायटी यांच्या साठी राखीव वेगवेगळया यादया संबंधीत विभागांनी नोटीस बोर्डवर लावण्यात आलेल्या होत्या. तसेच जि.प.च्या संगणक संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. दिनांक ३१/१०/२०११ ते ०२/११/२०११ रोजी पर्यंत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता व मजुर सहकारी सोसायटी यांचे इच्छापत्र सर्व संबंधीत कार्यालयांनी भरुन घेतलेले असुन त्याप्रमाणे एकच इच्छापत्र व एका पेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामांच्या यादया संबंधीत विभागाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेल्या होत्या. तसेच जि.प.च्या संगणक संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. प्राप्त यादयांनुसार काम वाटपासाठी कामांची संख्या खालील प्रमाणे होती.

| **अ क्र** | **विभाग** | **एकुण कामे** | **सोसायटयांना वाटप करावयाची कामे** | **सु.बे.अ.यांना वाटप करावयाची कामे** |
|---|---|---|---|---|
| १ | जि.प.सा.बां उत्तर विभाग | ११ | ०५ | ०६ |
| २ | जि.प.सा.बां दक्षिण विभाग | ० | ० | ० |
| ३ | जि.प.ल.पा विभाग | ०३ | ०२ | ०१ |
| ४ | जि प ग्रापापु विभाग | ०७ | ०३ | ०४ |

वरील प्रमाणे सर्व विभागाकडील कामांच्या यादया दि. ३१/१०/२०११ रोजी संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी त्यांचेकडील नोटीसबोर्डवर लावण्यात आलेल्या होत्या. नोटीस मध्ये इच्छुक सोसायटी/सु.बे.अ.ठेकेदार यांचे इच्छा पत्राप्रमाणे एकच इच्छापत्र प्राप्त झालेले व एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त झालेल्या कामांच्या यादया बैठकिच्या आदल्या दिवशी म्हणजेच दि. ०३/११/२०११ दु. २.०० वा. संबंधीत विभागाचे नोटीस बोर्डावर लावण्यात आल्या.

जि.प.सा.बां. उत्तर विभागाकडील मजुर सहकारी संस्थांसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या ०५ कामांचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

एकमेव इच्छापत्र प्राप्त कामे – ०५

एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामे – ००

ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे – ००

कामावर एकही इच्छापत्र दाखल नसलेली कामे – ००

एकुण कामे -०५

जि.प.सा.बां. उत्तर विभागाकडील सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या ०६ कामांचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

एकमेव इच्छापत्र प्राप्त कामे – ०५

एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामे – ०१

ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे – ००

कामावर एकही इच्छापत्र दाखल नसलेली कामे – ००

एकुण कामे – ०६

जि.प. ल.पा विभागाकडील मजुर सहकारी संस्थांसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या ०२ कामांचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

एकमेव इच्छापत्र प्राप्त कामे – ०१

एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामे – ०१

ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे – ००

कामावर एकही इच्छापत्र दाखल नसलेली कामे – ००

एकुण कामे - ०२

जि.प. ल.पा विभागाकडील सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या १ कामांचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

एकमेव इच्छापत्र प्राप्त कामे – ०१

एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामे – ००

ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे – ००

कामावर एकही इच्छापत्र दाखल नसलेली कामे – ००

एकुण कामे - ०१

जि.प.ग्रा.पा.पू. विभागाकडील मजुर सहकारी संस्थांसाठी राखुन ठेवण्यात आलेल्या ३ कामांचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

एकमेव इच्छापत्र प्राप्त कामे – ००

एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामे – ००

ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे – ००

कामावर एकही इच्छापत्र दाखल नसलेली कामे – ०३

एकुण कामे – ०३

जि.प.ग्रा.पा.पू. विभागाकडील सुशिक्षित बेरोजगार अभियंतासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या ४ कामांचे विवरण पत्र खालील प्रमाणे आहे.

एकमेव इच्छापत्र प्राप्त कामे – ००

एकापेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त कामे – ००

ग्रामपंचायतीने मागणी केलेली कामे – ००

कामावर एकही इच्छापत्र दाखल नसलेली कामे – ०४

एकुण कामे – ०४

**वरील प्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील कामे दिनांक ०२/११/२०११ रोजी जि.प.च्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्याने कामास स्पर्धा झालेली नाही सबब सदर कामे काम वाटप समितीच्या पुढील सभेस घेणेबाबत काम वाटप समितीने सुचना केल्याने सदर कामे काम वाटप समितीच्या पुढील वाटप दिनांकास घेण्यात येतील. तशी सुचना संबंधित कार्यकारी अभियंता यांना देण्यात आलेली आहे.**

ज्या कामांना एकच इच्छापत्र प्राप्त झाले आहे ती कामे संबंधीत इच्छापत्र देणा-या सोसायटी किंवा सु.बे.अ.यांना देणेबाबत समितीने निर्णय घेतला व ज्या कामांना एक पेक्षा जास्त इच्छापत्र प्राप्त झालेल्या त्या कामांसाठी उपस्थित समिती सदस्य व सोसायटी व सु.बे.अ. यांचे समोर लॉटरी पध्दतीने काम वाटप करण्यात आले. मजुर सहकारी संस्था, सु.बे.अ. यांना वरील प्रमाणे वाटप केलेल्या कामांची यादी सोबत जोडली आहे. सदरची यादी सचिव तथा कार्यकारी अभियंता यांनी कार्यालयाच्या सुचना फलकावर लावणेबाबत सुचना देण्यात आल्यात.

उपरोक्त काम वाटप केलेले काम संबंधीत मजुर सहकारी संस्था/सु.बे.अ. यांना देण्यात आलेल्या पासबुक मध्ये नोंदविणेबाबत सचिव तथा कार्यकारी अभियंता यांना सुचना देयात

आल्यात. सर्व कार्यकारी यंत्रणांना बैठकित सांगण्यात आले कि, त्यांनी काम वाटप समितीकडे पाठवावयाची यादी उपरोक्त शासन निर्णय दि.८ मे २००७ नुसार व विशेषः मुददा ३.२.८ तपासुन पाठवावयाची असल्याने त्यांनी शासन निर्णयातील सुचनांचे पुर्णपणे पालन करावे. कार्यकारी अभियंता यांचे स्तरावरच सोसायटी/सु.बे.अ./ठेकेदार/खुल्या निविदा ३३ः३३ः३४ चे प्रमाण राखावे.

पुढील बैठक सचिव तथा कार्यकारी अभियंता जि प सा बां उत्तर विभाग यांचेकडे पुरेशा कामांची यादी प्राप्त झालेवर अति.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहमतीने चर्चा करुन दिनांक निश्चीत करण्याचे सांगण्यात आले.

वरील प्रमाणे काम वाटप झालेवर बैठकिस उपस्थित अधिका-यांचे आभार मानुन बैठक समाप्त करण्यात आली.

सचिव, काम वाटप समिती तथा
कार्यकारी अभियंता
जि.प.सा.बां.उत्तर विभाग
अहमदनगर

अध्यक्ष काम वाटप समिती तथा
अति मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत - १. सर्व समिती सदस्य, काम वाटप समिती ..............................यांना माहितीस्तव.